महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ९

# महाराजा सयाजीराव आणि सावित्रीबाई फुले

शिवानी घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ९

# महाराजा सयाजीराव
# आणि
# सावित्रीबाई फुले

शिवानी घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि सावित्रीबाई फुले
इतिहास
शिवानी घोंगड
●
प्रकाशन क्रमांक - २९
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : शिवानी घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर. ४१६११४
मो. ८०१०४४७७४०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २४ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# सावित्रीबाई फुले

ब्रिटिशांचे भारतातील आगमन हे प्रबोधन आणि आधुनिकीकरणाचे प्रमुख कारण होते. भारत ब्रिटिशांमुळे गुलाम झाला असे आपण म्हणतो. परंतु ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी २,००० वर्षांहून अधिक काळ भारतात अस्तित्वात असणारी धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी मात्र आपण फारशी गंभीरपणे घेत नाही. जात नावाची व्यवस्था ही गुलामगिरी अबाधित ठेवण्यासाठी अतिशय सूत्रबद्धपणे कार्यरत होती. या व्यवस्थेच्या माध्यमातून हिंदू समाजव्यवस्थेचे २,५०० जातींमध्ये तुकडे झाले. प्रत्येक जात उच्च-नीचतेच्या मानसिक दबावाखाली इतरांचा द्वेष करण्यामध्ये गुंतवून ठेवण्यात आली. या व्यवस्थेमध्ये सर्वाधिक लाभ ब्राह्मण या संख्येने कमी असणाऱ्या तसेच जातिव्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या जातीला मिळत होते. या अत्यंत गुंतागुंतीच्या रचनेने विषमतेचे, शोषणाचे आणि गुलामगिरीचे जे प्रारूप विकसित केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. म्हणूनच भारतीय समाजव्यवस्था

अभ्यासत असताना जात ही संकल्पना तटस्थपणे आणि वस्तुनिष्ठपणे समजून घेतल्याशिवाय भारतीय समाजातील अंतर्विरोध आणि समस्या यांचे परिपूर्ण आकलन केवळ अशक्य ठरते. महत्त्वाचे म्हणजे जातीची गुलामगिरी आणि स्त्रीदास्य या दोन संकल्पनासुद्धा स्वतंत्रपणे अभ्यासता येत नाही एवढ्या त्या एकरूप आहेत.

ब्रिटिशांमुळे या प्रश्नांच्या अभ्यासाला चालना मिळाली. या सत्तेबरोबर आलेले युरोपियन आणि अमेरिकन ख्रिश्चन धर्मप्रसारकांमुळे हिंदू धर्मसुधारणेचा मार्ग मोकळा झाला. फुले हे या सर्व बौद्धिक वातावरणात विकसित झालेले भारतातील सर्वात क्रांतिकारक सुधारक मानले जातात. कारण जात आणि स्त्रीदास्य यांची एकत्रित आणि पथदर्श मांडणी फुल्यांनी केली. सयाजीराव महाराजांनी ज्या तऱ्हेने फुल्यांच्या तत्त्वज्ञानात्मक मांडणीला विचार आणि कृतीची जोड दिली ती पाहता फुले विचाराचे विकासक म्हणून ते महत्त्वाचे ठरतात. सयाजीरावांनी फुल्यांना महात्मा ही पदवी देण्याची सूचना सत्यशोधकांना केली तर फुल्यांनी आपल्या बैठकीच्या खोलीत आपला आदर्श म्हणून सयाजीरावांचा फोटो लावला होता.

## फुले : भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रवर्तक

शिक्षण हा सामाजिक सुधारणेला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. भारतातील बहुजन समाजाच्या अधोगतीचे प्रमुख कारण निरक्षरता हे होते. पारंपरिक भारतीय समाजव्यवस्थेने

वरिष्ठ जातींतील मूठभर लोकांनाच शिक्षणाचा अधिकार देताना बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवले. या बहुजन समाजाला शिक्षण देण्याच्या उद्देशाने महात्मा फुलेंनी १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठीची पहिली शाळा स्थापन केली. परंतु स्वत: महात्मा फुले या शाळेत मुलींना शिक्षण देत असल्यामुळे बहुजन समाज आपल्या मुलींना शाळेत पाठवण्यासाठी तयार होत नव्हता. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी फुलेंनी स्वत:च्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देण्यास सुरुवात केली. सावित्रीबाईंना शिक्षित करत असताना या पती-पत्नींना समाजाच्या प्रचंड निंदानालस्तीला तोंड द्यावे लागले. भारतातील पहिल्या स्त्रीशिक्षिका सावित्रीबाईंच्या घडवणुकीची ही पूर्वतयारी होती.

फुलेंनी स्त्रीशिक्षणाला भेडसावणाऱ्या महिला शिक्षिकेचा प्रश्न स्वत:च्या घरातील स्त्रीला शिकवून सोडवला. स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणाऱ्या या समाजसुधारणेची सुरुवात स्वत:च्या घरातूनच करण्याचा आदर्श महात्मा फुलेंनी भारतातील सर्व समाजसुधारकांसमोर ठेवला. भारतातील पहिल्या स्त्रीशिक्षिकेबरोबरच मुख्याध्यापिका, कवयित्री, समाजसेविका म्हणून सावित्रीबाईंना घडवण्यात फुलेंचे योगदान अनन्यसाधारण आहे. फुले दाम्पत्याने लावलेल्या बहुजन शिक्षणाच्या या 'रोपट्या'चे महाराजा सयाजीरावांनी आपल्या बडोदा संस्थानात 'वटवृक्षा'त रूपांतर केले. महात्मा फुलेंचे

स्वप्न त्यांच्या अपेक्षेहून अधिक प्रमाणात सत्यात उतरवणाऱ्या सयाजीरावांचे फुले दाम्पत्याच्या कार्याला दिलेले भक्कम पाठबळ आजवर दुर्लक्षित राहिले.

## फुले आणि सयाजीराव : शूद्रातीशूद्रांचे मुक्तिदाते

बहुजनांच्या उत्कर्षासाठी आपले आयुष्य 'वेचलेल्या' महात्मा फुलेंनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर कमिशनसमोर बहुजनांच्या शिक्षणासंदर्भात केलेली मागणी अशा प्रकारची भारतातील पहिली आणि म्हणूनच क्रांतिकारक मागणी मानली जाते. या निवेदनात फुलेंनी शूद्रातिशूद्रांच्या मोफत शिक्षणाचा आग्रह धरतानाच शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी शिष्यवृत्ती आणि बक्षिसे यासारखे प्रयत्न करावेत, शिक्षण सक्तीचे करावे, अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा उघडाव्यात यासारख्या मागण्या केल्या होत्या. सयाजीराव १८७५ ला बडोदा गादीला दत्तक गेले. १८८१ मध्ये त्यांना राज्याधिकार प्राप्त झाले आणि १८८२ ला बडोद्यातील सोनगड तालुक्यातील आदिवासी आणि अस्पृश्यांसाठी मोफत शिक्षणाचा पहिला क्रांतिकारक हुकूम त्यांनी काढला. या हुकुमानुसार सरकारी खर्चाने शिक्षण व राहण्या-खाण्याची मोफत सोय असणारे वसतिगृह सुरू झाले. पुढे १८९३ मध्ये अमरेली जिल्ह्यातील १० गावांमध्ये हा कायदा लागू केला. १९०६ मध्ये संपूर्ण बडोदा राज्यात सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची सोय केली.

प्राथमिक शिक्षणाच्या या कायद्यानुसार १० वर्षे वयापर्यंतची मुले व ८ वर्षे वयापर्यंतच्या मुली शाळेत पाठवणे पालकांना बंधनकारक केले. जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना दिवसाला १ रु. दंडाची तरतूदही केली. दंडाची जी रक्कम जमा होईल त्याच्या ६० टक्के रक्कम शाळांच्या इमारती बांधण्यासाठी, ३५ टक्के रक्कम गरीब विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी आणि ५ टक्के रक्कम तलाठी म्हणून काम करणाऱ्या पटेलांसाठी वापरण्याची तरतूद केली होती. पुढे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने १९१० मध्ये अलाहाबादच्या राष्ट्रीय अधिवेशनात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची मागणी केली होती. इतकेच नव्हे तर १८८२ ला जेव्हा फुले स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणाचा हक्क मागत होते त्याचवर्षी सयाजीरावांनी बडोद्यामध्ये स्त्रीशिक्षिका तयार करण्यासाठी स्त्रियांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू केले. महात्मा फुलेंच्या जीवनकार्याचा सयाजीरावांनी केलेला ‘विस्तार’ थक्क करणारा आहे.

## सयाजीराव आणि सत्यशोधक कार्यकर्ते

आपल्या सामाजिक सुधारणांच्या उपक्रमांमध्ये सत्यशोधक समाज, आर्य समाज आणि प्रार्थना समाजाचा सुयोग्य उपयोग करून घेणाऱ्या सयाजीरावांनी या सर्वांमध्ये सत्यशोधक समाजाच्या धोरणांना सर्वाधिक प्रमाणात स्वीकारले होते. राज्याधिकार प्राप्तीनंतर १८८४ मध्ये सयाजीरावांनी रामचंद्र विठोबा धामणस्कर या महत्त्वाच्या सत्यशोधकास ब्रिटिश

नोकरीतून बोलावून बडोद्यात नायब सुभे या पदावर नियुक्त केले. ही नियुक्ती मुंबईच्या मामा परमानंदांच्या शिफारशीवरून झाली होती. धामणस्कर पुढे १९०१ मध्ये बडोदा संस्थानचे दिवाण झाले. वासुदेव लिंगोजी बिर्जे हे सत्यशोधक सयाजीरावांच्या पॅलेस लायब्ररीचे ग्रंथपाल होते. त्यांचे 'क्षत्रीय व त्यांचे अस्तित्व' हे पुस्तक सयाजीरावांच्या आश्रयानेच प्रकाशित झाले. १९०० मध्ये कोल्हापुरात उद्भवलेल्या वेदोक्त प्रकरणात बिर्जेलिखित हा ग्रंथ पुरावा म्हणून वापरण्याबाबतची चर्चा कोल्हापूर दरबारात झाली होती.

ऑक्टोबर १८८५ मध्ये रामजी संतुजी आवटे यांनी 'बडोदा वत्सल' हे सत्यशोधकी साप्ताहिक बडोद्यात सुरू केले. १८९६ च्या दरम्यान आवटे आणि धामणस्करांनी मिळून बडोद्यात माधवराव पवार यांच्या घरी मराठा जातीचे पुजारी तयार करण्याचा वर्ग सुरू केला. १७ फेब्रुवारी १९३० रोजी महाराजांनी लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये सत्यशोधक समाजाच्या काही कार्यकर्त्यांची व्याख्याने लोकांसाठी मुद्दाम ठेवली होती. त्यावेळी महाराज स्वत: हजर होते. यामध्ये एक सत्यशोधक नारो बाबाजी महागट यांना मदत म्हणून २०० रु. रोख दिले. नामांकित कंत्राटदार असणाऱ्या स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू या प्रमुख सत्यशोधक नेत्याला आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्याच्या बांधकामास हातभार लावण्याची संधी दिली होती. बहुजन

साक्षरतेसाठी अथक प्रयत्न करणाऱ्या सयाजीरावांइतकी सत्यशोधक विचाराची भक्कम पाठराखण अन्य कोणत्याही प्रशासकाने केली नाही.

## सयाजीरावांकडून फुलेंची पाठराखण

सत्यशोधक चळवळीची भक्कम पाठराखण करणाऱ्या सयाजीरावांनी या चळवळीचे जनक महात्मा फुलेंनादेखील वेळोवेळी मदत केली. १८८४ मध्ये महाराजांनी धामणस्करांकरवी फुलेंना बडोद्याला बोलावले. फुलेंच्या या बडोदा भेटीवेळी महाराजांनी समाजसुधारणा या विषयावरील त्यांची २-३ व्याख्याने आयोजित केली. महात्मा फुलेंचे विचार कृतीत उतरवतानाच सयाजीरावांनी आर्थिक संकटाच्या काळात त्यांना मदतही केली. पक्षाघाताच्या पहिल्या आजारपणात उपचारासाठी सयाजीरावांनी फुलेंना आर्थिक मदत केली. आपल्या बडोदा भेटीत जोतीबांनी महाराजांना आपला 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ वाचून दाखवला. महाराजांनी या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी मदत केल्याचा उल्लेख या ग्रंथाच्या शेवटच्या पानावर आढळतो.

जोतीबा फुले यांचा उल्लेख महाराज नेहमी महात्मा असा करत. महाराजांनी मुंबईमधील सत्यशोधक कार्यकर्त्यांना जोतीरावांना महात्मा पदवी देण्याची सूचना केली. त्यानुसार सत्यशोधक कार्यकर्त्यांनी १८८८ मध्ये मुंबई येथे फुलेंना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली. तर सयाजीरावांबद्दल आपल्याला वाटणारा आदर

फुलेंनी एक अखंड लिहून व्यक्त केला. हा अखंड त्यावेळी दीनबंधू वर्तमानपत्रात प्रकाशित झाला होता. सयाजीराव आणि महात्मा फुले या दोन महापुरुषांमधील आदरयुक्त नात्याचा हा पैलू दुर्दैवाने आजवर दुर्लक्षित राहिला.

## फुले आणि सयाजीराव : स्त्रीउन्नतीचे सहप्रवासी

महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन स्वत:पासून समाज परिवर्तनास सुरुवात केली. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका, कवियित्री आणि समाजसेविका या विविध भूमिकांतून सावित्रीबाईंनी स्त्रियांसाठी कार्य केले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी खर्ची घातले. त्यामुळेच त्यांना महिलांचा मुक्तिदाता असेही म्हटले जाते. फुलेंप्रमाणेच सयाजीरावांनी विवाहापर्यंत निरक्षर असणाऱ्या महाराणी चिमणाबाईंना शिक्षण देऊन स्त्री विकासाच्या कार्यात सहभागी करून घेतले. मुलींच्या शिक्षणासाठी चिमणाबाईंनी स्वत:च्या खानगी खर्चातून महिन्याला २०० रु. ची तरतूद केली होती. त्याचप्रमाणे बॉम्बे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी महाराणी चिमणाबाईंनी स्वतंत्रपणे १,००,००० रुपयांची रक्कम ठेव म्हणून ठेवली होती.

स्त्री-उन्नतीसाठी कार्यरत राहिलेल्या महाराणी चिमणाबाईंना ३ ऑगस्ट १८९२ ला ब्रिटिश महाराणींनी 'Emperial Order of the Crown of India' या किताबाने सन्मानित करण्यात

आले. १९०६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेतील महिला विभागाच्या अध्यक्षा म्हणून चिमणाबाईंची निवड करण्यात आली होती. याच अधिवेशनाच्या सर्वसाधारण विभागाचे अध्यक्ष सयाजीराव महाराज होते. १९२७ मध्ये पुण्यात भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय महिला परिषदेचे अध्यक्षपद चिमणाबाईंना सन्मानपूर्वक देण्यात आले.

महात्मा फुलेंनी आग्रह धरलेल्या स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचे सयाजीरावांनी आपल्या खाजगी जीवनातही केलेले अनुकरण विचारात घेणे गरजेचे ठरते. महाराणी चिमणाबाई १९१४ पर्यंत पडदा पद्धतीचा अवलंब करत होत्या. सयाजीरावांना मात्र ही पडदा पद्धत मान्य नव्हती. परंतु सयाजीराव महाराणींना कोणत्याच गोष्टीची सक्ती करत नसत, तर त्यांनी महाराणींना त्यांच्या मर्जीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले होते. महाराज परदेश प्रवासावेळी आपल्यासोबत महाराणी चिमणाबाईंनाही घेऊन जात असत. परदेश प्रवास करताना महाराणी चिमणाबाई पडदा पद्धतीचा अवलंब करत नव्हत्या. पाश्चिमात्य स्त्री इतक्याच मोकळेपणाने त्या परदेशात वावरत असत. १९१४ मध्ये महाराणींनी स्वतःहून पडदा पद्धतीचा त्याग केला. चिमणाबाई पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या राजघराण्यातील पहिल्या महिला होत्या.

## फुलेंच्या स्त्री उद्धाराच्या धोरणाचा विकास

फुलेंनी सावित्रीबाईंच्या सोबतीने शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांच्या उत्कर्षाचा मार्ग तयार केला. स्त्रियांना शिक्षण देण्याबरोबरच केशवपन, बालविवाह, विधवाविवाह, सती जाणे यासारख्या अनिष्ट चालीरीतींमधून त्यांना मुक्त करण्यासाठी अविरत प्रयत्न केले. महिलांना अंधश्रद्धा व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी 'महिला सेवा मंडळा'ची स्थापना केली. सयाजीरावांनी फुले व सावित्रीबाईंनी आखलेल्या स्त्री उद्धाराच्या कार्यक्रमाचा विकास करत स्त्री सक्षमीकरणाचे परिपूर्ण 'मॉडेल' बडोद्यात उभारले.

सयाजीरावांनी बडोदा संस्थानात स्त्रियांसाठी अनेक संस्था उभारून त्यांच्या सर्वांगीण विकासास चालना दिली. फिमेल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना, अस्पृश्य मुलींसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना, आदिवासी मुलींसाठी भारतातील पहिली मोफत निवासी शाळा, भारतातील पहिले महिलांसाठीचे ग्रंथालय, भारतातील पहिला महिलांसाठीचा क्लब, स्त्रियांसाठीची भारतातील पहिली व्यायामशाळा, भारतातील पहिल्या बाल सप्ताहाचे आयोजन अशा अनेक योजना भारतात पहिल्यांदा राबविण्याचे श्रेय सयाजीरावांना जाते. याबरोबरच महाराजांनी स्त्रियांसाठी विविध कायदे करून त्यांना समाजात असणारा दुय्यम दर्जा उंचावण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. विधवा पुनर्विवाहाचा कायदा (१९०१), हिंदू कोड बिल (१९०५), हिंदू विवाह कायदा

(१९०५), मुला-मुलींसाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा (१९०६), विशेष विवाह कायदा (१९०८), हिंदू घटस्फोट कायदा (१९३१), हिंदू स्त्रियांना संपत्तीतील हक्क कायदा (१९३३), स्त्रियांना मतदानाचा अधिकार, सरकारी नोकरीत स्त्रियांना प्रवेश असे हे भारतातील ५६५ संस्थानांमध्ये बडोदा संस्थानने केलेले पहिले व प्रागतिक कायदे आहेत.

हा सर्व इतिहास विचारात घेता सयाजीरावांचे स्त्रीविषयक कार्य हे भारतातील स्त्री सक्षमीकरणाच्या इतिहासातील मैलाचा दगड असल्याचे सिद्ध होते. आपला वैभवशाली अज्ञात इतिहास समजून घेण्याचा आनंद सयाजीरावांच्या स्त्रीविषयक कामातून मिळतो त्याचबरोबर या सगळ्यातून व्यक्त होणारा सयाजीरावांचा दृष्टिकोन आजच्या स्त्री-पुरुषांना आपल्या स्त्री विषयक दृष्टिकोनाच्या दुरुस्तीसाठी सर्वात आदर्श पर्यायसुद्धा देतो.

## सावित्रीबाईंना आर्थिक पाठबळ

१८९० मध्ये फुलेंच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई आणि यशवंत यांना अत्यंत हलाखीत दिवस काढावे लागत होते. मामा परमानंदांच्या विनंतीवरून महाराजांनी सावित्रीबाईंच्या मदतीसाठी धामणस्करांच्या हस्ते एक हजार रुपयांचा चेक पाठवून दिला. मामांचे स्नेही तुकाराम तात्या भागीदार असणाऱ्या एस. नारायण कंपनीत हा चेक ठेवून त्या रकमेच्या व्याजातून दर तिमाहीस सावित्रीबाईंना ५० रु. मदत मिळण्याची

व्यवस्था करण्यात आली. या ठेवीची पावती सावित्रीबाईंकडे ठेवण्याच्या सयाजीरावांच्या हुकूमाप्रमाणे ही पावती रजिस्टर पत्राने सावित्रीबाईंकडे पाठवण्यात आली.

यासंदर्भात महादू सहादू वाघोले यांची आठवण महत्त्वपूर्ण आहे. वाघोले म्हणतात, "तात्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कुटुंब सावित्रीबाई व मुलगा यशवंता यांना फार वाईट दिवस आले. त्यांना खाण्याकरता व यशवंताचे शिक्षणाकरिता बिलकूल पैसा नव्हता. ही गोष्ट तात्यांच्या मित्रांनी श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या कानावर घातली. तेव्हा महाराजांनी काही रक्कम सावित्रीबाई यांच्याकडे पाठविली होती त्या रकमेवर बरेच दिवस त्यांनी जुगताईने आपला उदरनिर्वाह व यशवंताचे शिक्षण चालविले होते." सयाजीरावांनी केलेल्या मदतीमुळेच फुलेंच्या पश्चात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई आणि मुलगा यशवंत सन्मानपूर्वक आयुष्य जगू शकले याची साक्ष वाघोलेंची ही आठवण देते. १८९७ मधील प्लेगच्या साथीत आपला जीव धोक्यात टाकून रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉ. यशवंतचे सुरुवातीचे शिक्षण सयाजीरावांच्या आर्थिक पाठबळावरच झाले होते.

सावित्रीबाईंना पेन्शन मंजूर करतेवेळीच सयाजीरावांनी धामणस्करांकडे महात्मा फुलेंच्या स्मारकाची आवश्यकता व्यक्त केली होती. यासंदर्भात महाराज धामणस्करांना म्हणाले, "जोतीबांचे स्मारक होणे जरूर आहे आणि ते करण्याचे

कोणी मनावर घेत असल्यास त्यांच्या स्मारक फंडासाठी मदत करण्याची माझी तयारी आहे.” सत्यशोधक चळवळीचा पाया घालणाऱ्या महात्मा फुलेंच्या स्मारकाची आवश्यकता सर्वप्रथम स्पष्ट करतानाच या स्मारकासाठी मदत करण्याची सयाजीरावांनी दर्शवलेली तयारी त्यांच्या मनातील जोतीबांच्या कार्याविषयीची आपुलकी दर्शविते.

## साहित्यिक सावित्रीबाई आणि बडोदा

फुलेंच्या सहवासाने विचारसंपन्न झालेल्या सावित्रीबाईंनी आपले विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी लेखन व भाषणे यांचा मार्ग स्वीकारला. १९५४ मध्ये सावित्रीबाईंचा 'काव्यफुले' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहात त्यांनी समाजसुधारणाविषयक मानवतावादी दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष समतेवर आधारित नवसमाज निर्मितीचा विचार मांडला. केशवसुतांच्या अगोदर ३० वर्षे, तर जोतीबांच्या 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा' या १८६९ साली प्रकाशित झालेल्या काव्यात्मक रचनेच्या अगोदर १५ वर्षे हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला होता. जोतीरावांच्या मृत्यूनंतर १८९२ ला सावित्रीबाईंनी 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या दीर्घ काव्यातून महात्मा फुले यांचे अधिकृत असे पहिलेच काव्यात्मक चरित्र लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली. महात्मा फुलेंना त्यांच्या वैचारिक वाटचालीत सक्रिय पाठिंबा देणाऱ्या 'बडोद्या'ने हीच भूमिका सावित्रीबाईंबाबतही निभावली. १८९२

ला ‘बडोदा वत्सल’ प्रेसने सावित्रीबाईंचा भाषणसंग्रह प्रकाशित केला. फुले दाम्पत्याच्या वैचारिक आयुष्यात ‘बडोद्या’ने पुरवलेल्या खंबीर आधाराचा हा इतिहास आजवर ‘अंधारात’ राहिला.

## सावित्रीबाई आणि महाराणी चिमणाबाई

सयाजीरावांच्या प्रेरणेने महाराणी चिमणाबाईंनी १९११ मध्ये भारतीय स्त्रियांच्या स्थितीची जगातील ७ खंडातील २९ देशांमधील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करणारा ‘The Position of Women in Indian Life’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ भारतीय स्त्रियांना अर्पण केला असून तो लंडनमधून प्रकाशित झाला होता. या ग्रंथाचे लेखन चिमणाबाईंनी एस.एम.मित्रा या विद्वानाच्या सहकार्याने केले होते. स्त्रियांना आत्मसन्मानासह सक्रिय सामाजिक सहभागासाठी काय करायला हवे याचा जागतिक परिप्रेक्ष्यात विचार करणारा जगातील हा एकमेव ग्रंथ आहे. तर जगातील स्त्रियांच्या स्थितीशी भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना करून लिहिलेला हा आजखेरचा एकमेव ग्रंथ आहे. लंडनमधील फरगॉटन बुक्स ने या पुस्तकाची १९१२ ला दुसरी आवृत्ती काढली आहे. फरगॉटन बुक्सचे वैशिष्ट्य म्हणजे ते जगातील ऐतिहासिक आणि दुर्मिळ ग्रंथांचे कोणताही बदल न करता पुनर्मुद्रण करते. चिमणाबाईंच्या या पुस्तकाला फरगॉटन बुक्सने classical reprint series मध्ये निवडले आहे. यावरून या पुस्तकाचा ऐतिहासिक दर्जा लक्षात येतो.

महात्मा फुले यांच्या कार्याबद्दल सयाजीरावांच्या मनात नितांत आदर होता. त्यामुळेच ते फुल्यांचा उल्लेख नेहमी महात्मा असा करत. जोतीरावांना महात्मा म्हणून संबोधणारे सयाजीराव हे पहिले होते. ही बाब सयाजीरावांच्या द्रष्टेपणाची साक्ष तर देतेच परंतु फुले विचाराची मौलिकता महाराजांनी किती नेमकेपणाने ओळखली होती हे स्पष्ट करते. फुले पती-पत्नींना सयाजीरावांनी केलेली मदत ही महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेसाठीसुद्धा महत्त्वाची होती. फुल्यांच्या मृत्यूनंतर सयाजीरावांनी सावित्रीबाईंना पेन्शन सुरु करून फुल्यांच्या विचार कार्याचा वारसा सन्मानाने जपला. हा इतिहास प्रेरणादायी आहे. पारंपरिक समाजव्यवस्थेमध्ये 'निरक्षर' राहिलेल्या बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी फुले दाम्पत्याने स्वीकारलेला शिक्षण प्रसाराचा मार्ग सयाजीरावांच्या समाजसुधारणेच्या धोरणाशी नाते सांगणारा होता. महात्मा फुलेंप्रमाणेच भारतातील पहिली स्त्रीशिक्षिका सावित्रीबाई फुलेंच्या जीवनात सयाजीरावांनी बजावलेली खंबीर 'पाठीराख्या'ची भूमिका आजवर अज्ञात राहिली. हा अज्ञात इतिहास समजून घेणे आपल्या इतिहास साक्षरतेला 'पूर्णत्व' प्राप्त करून देणारा ठरेल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची


१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com